<u>कोषागारातून रोख देय अनुदान</u>

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी अनुसूचित जाती उपयोजना (SCSP) या घटकासाठी केंद्र हिश्श्याचे अनुदान वितरीत करण्याबाबत. (२२१५ ९८४४)

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४/पापु-१०

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई-४०० ००१.

दिनांक: २३.०३.२०१८

<u>वाचा</u>- शासन निर्णय क्र. राग्रापे-२०१६/प्र.क्र.४४/पापु-१०, दिनांक ०३. मार्च, २०१८.

शासन शुध्दीपत्रक-

उपरोक्त संदर्भाधीन (वाचा) मधील शासन निर्णयातील परिच्छेदाऐवजी सुधारीत परिच्छेद खालीलप्रमाणे वाचावे.

या संदर्भात उपरोक्त लेखाशिर्षांतर्गत रु. ९१,२७,०००/- (रुपये एक्कावन्न लक्ष सत्तावीस हजार मात्र) एवढे अनुदान राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत रासायनिक बाधित (केमीकल कन्टॅमिनेशन) या घटकासाठी संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांना वितरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे BEAMS प्रणालीवर वितरीत करण्यात येत आहे. तसेच राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सौर उर्जेवरील दुहेरी पंप योजना राबविण्यासाठी रक्कम रु. २,६०,००,०००/- (रुपये दोन कोटी साठ लक्ष मात्र) संदर्भाधीन (वाचा) येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (BEAMS) मंजूर व मुक्त करण्यात येत आहे.

उपरोक्त संदर्भाधीन (वाचा) शासन निर्णयातील परिच्छेद-३ ऐवजी सुधारीत परिच्छेद-३ खालीलप्रमाणे वाचावे.

३. सदर रक्कम रु. ९१,२७,०००/- (रुपये एक्यान्नव लक्ष सत्तावीस हजार मात्र) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा), (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना व नियंत्रक अधिकारी म्हणून उप सचिव (श्री. म. भ. सावंत), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. सदर रक्कम आहरण व संवितरण अधिकारी तथा अवर सचिव (रोख शाखा) (श्री. का. जा. धलपे), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांच्या कार्यालयातून आहरीत करून ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी व तद्‌नंतर स्वतंत्र धनादेशान्वये सदर रक्कम पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई यांच्या बँक खात्यात जमा करावी. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर रक्कम केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच राज्य शासनाने या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांनुसार खर्च करावी.

तसेच उपरोक्त संदर्भाधीन (वाचा) मधील शासन निर्णयातील परिच्छेद-४ रद्द करण्यात येत आहे. त्याऐवजी सदर शासन निर्णयातील परिच्छेद-५ ऐवजी परिच्छेद-४ असे वाचावे. तसेच परिच्छेद-६ ऐवजी परिच्छेद-५ वाचावे व परिच्छेद-७ ऐवजी परिच्छेद-६ असे वाचावे.

७. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र २०१८०३२३१२२८१८३०२८ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Deelip Pandurang Patil

Digitally signed by Deelip Pandurang Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3810fd2c32f3841df60ca68a27ae50fdbc9fd6c506fd334325871d684bf3eef9, cn=Deelip Pandurang Patil
Date: 2018.03.23 12:29:03 +05'30'

(दिलीप पां.पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
२. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
३. नियोजन विभाग (कार्यासन-१४४३)/वित्त विभाग(व्यय-३), मंत्रालय, मुंबई.
४. सर्व विभागीय आयुक्त,
५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पाणी व स्वच्छता) सर्व जिल्हा परिषदा
७. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
८. संचालक, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
९. उप सचिव तथा नियंत्रक अधिकारी, पाणी पुरवठा व स्वचछता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. अवर सचिव तथा आहरण व संवितरण अधिकारी, (रोख शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी,
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१३. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई.
१४. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कार्यासने क्र. पा.पु.४, पा.पु. २०